प्रतिवादी क्र.१ व ४ तर्फे उर्वरीत उलटतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.

२०. मी मागील तारखेला दिलेला तपास वाचून पाहिलेला आहे. आम्ही या दाव्यात नारायणच्या तिस–या पत्नीला पक्षकार केलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो, त्याने मागील वेळी चुकून नारायणच्या तीन पत्नी असल्याचे सांगितले होते. हौसाबाई सखाराम पारपोलकर, मुक्ताबाई शिंदे, कमळाबाई लक्ष्मण सावंत आणि इंदूबाई लक्ष्मण जाधव या माझ्या आत्या आहेत. त्यापैकी केवळ इंदूबाई जाधव हयात आहे. आम्ही मयत आत्यांच्या सर्व वारसांना या दाव्यात पक्षकार केलेले नाही. आमचे आजोबा १९५९ साली वारल्यामुळे आम्ही आत्यांना दाव्यात पक्षकार केले नाही.

२१. माझे वडिल शिक्षक होते. ते १९८० पर्यंत नोकरी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या संपुर्ण घराण्यामध्ये केवळ माझे वडिल सुशिक्षित होते. मी या दाव्यात वडिलांच्या मृत्यूनंतर सहभागी झालो आहे. दावा दाखल करताना मी वडिलांसोबत येत होतो. त्यामुळे मला वडिलांनी दिलेल्या माहितीबाबत कल्पना आहे. माझा जन्म दि.१४.०३.१९७० रोजी झाला आहे. मला माझ्या जन्मापूर्वी आमच्या घराण्याकडे कोणत्या जमिनी होत्या याची प्रत्यक्ष माहिती नाही. मला माझ्या जन्मानंतर घराण्यात आलेल्या मिळकतीं बाबत वडिलांकडून माहिती मिळालेली आहे.

२२. मी आज प्रतिवादींनी दाखल केलेली कागदपत्रे पाहिलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जन्मापूर्वी आमची वेळवट्टी गावात दोन घरे होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी एक घर प्रतिवादी क्र.१ च्या व एक घर माझ्या वडिलांच्या नावावरती होते. हे म्हणणे खरे नाही की, वेळवट्टी गावामध्ये मी व प्रतिवादी क्र.१ वेगवेगळे राहत असून आमच्या घराच्या पाठीमागे आमचे स्वतंत्र परडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील घरांची आजरोजीची किंमत सात लाखांपेक्षा जास्तीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वेळवट्टी येथे राहत असलेली घरे आमच्या आजोबांनी बांधलेली नाहीत. दावा मिळकत क्र.१/क ही आजरा गावठाण हद्दीतील मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी त्या घरांची किंमत आठ लाखांपेक्षा जास्त आहे.

२३. देवर्डे येथील दावा मिळकत १/इ मधील गट क्र.१३९ चा सर्वे क्र.४६ असून त्याचे क्षेत्र २६ गुंठे आहे. सदर मिळकत आमच्या आजोबांच्या नावे नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर

मिळकत १९८० सालापासून प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीची प्रतिवादी क्र.१ ने १९८० साली स्वतःच्या पैशांतून खरेदी केली आहे. आज रोजी माझे वडिल हयात नसल्यामुळे सदर मिळकत खरेदी करण्यासाठी त्यांनी दिलेल्या रकमेचा लेखी पुरावा मी सादर करु शकत नाही. सदर मिळकतीचा ७/१२ उता–याला माझ्या वडिलांची अथवा माझ्या नावाची नोंद नाही. माझ्याकडे सदर जमिनीत ताबा असल्याचे दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही.

**२४.** प्रतिवादी क्र.१ पुर्वीपासून शेती करतो. मसोली येथील दावा मिळकत क्र.१/ई मधील गट क्र.५१ चा पुर्वीचा सर्वे क्र.२५/२ आणि गट क्र.५३ चा पुर्वीचा सर्वे क्र.२७ आहे. सदर दोन्ही जमिनी सरकारी मुलकीपडीच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींच्या मालकी हक्कात माझ्या आजोबांच्या नावाची कधीही नोंद नव्हती. मी सदर मिळकत आजोबांच्या ताब्यात असून ते कसत असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. मी सदर मिळकत आमच्या एकत्र कुटुंबात असून त्या आम्ही सामाईकात कसत असल्याबाबत वडिलांच्या नावे असलेला उतारा सादर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही मिळकतीं बाबतची कागदपत्रे प्रतिवादी क्र.१ च्या नावे झालेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती प्रतिवादी क्र.१ कसत असल्यामुळे शासनाने त्याच्या नावे कबूलायत करुन त्याच्या नावे बहाल केलेल्या आहेत. मी सदर मिळकतींच्या ७/१२ सदरी माझ्या वडिलांचे नाव असल्या बाबतचा उतारा सादर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती शासनाने बहाल केल्यावर त्याबाबतची फेरफार होऊन केवळ प्रतिवादी क्र.१ चे नाव लागलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींच्या कबूलायतीसाठी लागणारी संपुर्ण रक्कम केवळ प्रतिवादी क्र.१ ने भरलेली आहे. आम्ही एकत्र राहत असल्यामुळे पैसे भरल्याचा स्वतंत्र कागदोपत्री पुरावा नसून तो सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही मिळकतीत आमची वहिवाट असल्याचे दर्शवणारा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही मिळकती प्रतिवादी क्र.१ च्या स्वार्जित मिळकती असून एकत्रीत कुटुंबाच्या मिळकती नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींशी आमचा कोणताही हक्कसंबंध नसून त्यामध्ये आमची वहिवाट नाही. माझ्याकडे सदर मिळकती एकत्र कुटुंबासाठी बहाल झाल्याचे दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही.

**२५**. वेळवट्टी येथील दावा मिळकत १/अ मधील गट क्र.२४७ चे एकूण क्षेत्र ०.४० आर असून त्याचा जुना सर्वे क्र.५०/१ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकत पुर्वी प्रेमीला मानसिंगराव देसाई हिच्या मालकीची होती. मला सदर मिळतीची आमच्या आजोबांच्या नावे नोंद होती किंवा नाही याची मला माहिती नाही. मी त्या मिळकतीत आमचे आजोबा कूळ असल्या बाबतचा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन दि.२३.१२.१९७५ रोजी प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी प्रत्येकी अर्धा हिस्याने खरेदी केलेली आहे. मी सदर मिळकतीतील प्रतिवादी क्र.१ ने खरेदी केलेल्या अर्धा हिस्यात आमचा ताबा असल्याचे दर्शवणारा भूसंपादनाचा कागद हजर केला आहे.

**२६**. हे म्हणणे खरे नाही की, दि.२३.१२.१९७५ रोजीच्या खरेदीपत्राने सदर मिळकतीला केवळ प्रतिवादी क्र.१ व ४ यांच्या नावांची नोंद झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी पासून अर्धा क्षेत्रामध्ये केवळ प्रतिवादी क्र.१ ची मालकी वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीशी आमचा कोणताही हक्कसंबंध नाही.

**२७**. वेळवट्टी येथील गट क्र.२५८ व २५९ चा पुर्वीचा अनुक्रमे सर्वे क्र.५०/२ व ५०/३ असून त्या प्रेमीला मानसिंगराव देसाई च्या मालकीच्या होत्या. सदर मिळकतींना आमचे आजोबा अगोदर वारल्यामुळे त्यांच्या नावाची नोंद झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही मिळकती आमच्या घराण्यात वाडवडिलार्जित हक्काने आलेल्या नाहीत. माझ्याकडे सदर मिळकतींना आमचे आजोबा कूळ असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही मिळकती दि.२३.१२.१९७५ रोजीच्या खरेदीदस्त क्र.१००४ ने प्रतिवादी क्र.१, ३ आणि शंकर भिमा शिंदे यांनी खरेदी केलेल्या आहेत. माझ्याकडे सदर मिळकतीत आमचा ताबा असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींच्या खरेदीपत्राबाबत माझ्या वडिलांनी तक्रार केली नाही. माझ्याकडे त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीमध्ये खरेदीपासून प्रतिवादी क्र.१, ३ व शंकर शिंदे यांची मालकी वहिवाट आहे. माझ्याकडे गट क्र.२४७, २५८ आणि २५९ च्या मिळकती एकत्रीत कुटुंबासाठी खरेदी केल्याचे व एकत्रीत कुटुंबाच्या ताब्यात असल्याचे दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींशी आमचा कोणताही हक्कसंबंध नाही.

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, वेळवट्टी येथील गट क्र.५, १३, १९, ३५, १५९, २८६, २५६ आणि दावा मिळकत क्र.१/ड याच आमच्या एकत्रीत कुटुंबाच्या मिळकती आहेत.

**२९.** मला माझ्या वयाच्या १७–१८ व्या वर्षापासून समज आली आहे. माझे वडिल प्राथमिक शिक्षक असल्यामुळे त्यांनी वेगवेगळया ठिकाणी नोकरी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वडिलांसोबत ते नोकरी करत असलेल्या ठिकाणी राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जन्मावेळी माझे वडिल व प्रतिवादी क्र.१ वेगवेगळे राहत होते. आमचे आजोबा १९५८ साली मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आजोबांच्या मृत्यूनंतर १९५९ साली माझे वडिल व प्रतिवादी क्र.१ मध्ये गट क्र.५, १३, १९, ३५, १५९, २८६, २५६ आणि दावा मिळकत क्र.१/ड या मिळकतींचे वाटप झाले होते.

**३०.** मी शेतीकाम करतो. मी सर्व शेतात जातो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.५ व २८६ मधील उत्तरेकडील अर्धी जमीन आमच्या व दक्षिणेकडील अर्धी प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१३, १९, ३५ व १५९ मधील दक्षिणेकडील अर्धी जमीन आमच्या व उत्तरेकडील अर्धी जमीन प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२५६ मधील पश्चिमेकडील अर्धी जमीन आमच्या व पूर्वेकडील अर्धी जमीन प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे.

**३१.** हे म्हणणे खरे नाही की, मी राहत असलेले घर दोन जाप्त्यांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, १९५९ साली झालेल्या वाटण्यांप्रमाणे त्यातील पुर्वेचा हिस्सा आम्हाला व पश्चिमेचा हिस्सा प्रतिवादी क्र.१ ला देण्यात आलेला असून मिळालेल्या हिस्याच्या पाठीमागील बाजूस स्वतःचे स्वतंत्र शौचालय आहेत. हे म्हणणे खरे नाही की, १९५९ साली झालेल्या वाटपा प्रमाणे आमची व प्रतिवादी क्र.१ ची केवळ वडिलार्जित मिळकतीमध्ये अर्धी– अर्धी वहिवाट आहे.

**३२.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला वाटून मिळालेल्या हिस्यामध्ये दि.१८.०९.२०१६ रोजी दस्त क्र.१३०६ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व ४ मध्ये वाटण्या झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटपा प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व ४ च्या नावाच्या स्वतंत्र नोंदी झाल्या असून त्यामध्ये केवळ त्यांचीच कब्जेवहिवाट आहे. मी दावा मिळकतींचे ७/१२ उतारे पाहिले

आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व ४ च्या नावांची स्वतंत्र नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.२५६ मधील ०.५६ आर क्षेत्र मयत प्रतिवादी क्र.५ ने खरेदी केले होते.

**३३.** मी दावा मिळकत क्र. १/क चे मालमत्ता पत्रक पाहिले असून त्यावरती कृष्णा नारायण शिंदे, दादू नारायण शिंदे, अर्जुन नारायण शिंदे, यशवंत नारायण शिंदे आणि मयत शामराव चे वारस सुरेंद्र यांच्या नावाची नोंद आहे. आज रोजी त्यातील कृष्णा, दादू, यशवंत आणि शामराव हे मयत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर मयतांच्या वारसांना या दाव्यात पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही घर मिळकती हौसाबाई सखाराम पारपोलकरच्या ताब्यात होत्या व आज रोजी तिच्या पश्चात तिच्या वारसांच्या ताब्यात आहेत.

**३४.** वेळवट्टी गट क्र.२४७ मधील ०.४० आर जमीन सर्फनाला प्रकल्पासाठी संपादीत झाली होती. त्याबाबत संपादनाच्या नोटीसा आल्या होत्या. त्या नोटीसा ७/१२ सदरी असलेल्या सर्व हिस्सेधारकांना आल्या होत्या. साक्षीदार सांगतो, त्याच्या वडिलांना नोटीस मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीच्या संपादना बाबत माझ्या वडिलांना कोणतीही नोटीस आली नव्हती.

**३५.** हे म्हणणे खरे नाही की, देवर्डे येथील गट क्र.१३९, मसोली येथील गट क्र.५१ व ५३, वेळवट्टी येथील गट क्र.२५७ ते २५९ या आमच्या वडिलार्जित जमिनी नसल्यामुळे त्यामध्ये आमची कधीही ताबे वहिवाट नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर मिळकती आमच्या वडिलार्जित जमिनी असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या स्वकष्टार्जित मिळकती हडप करण्यासाठी आम्ही खोटा व चुकीचा दावा दाखल केला असून मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २३.०९.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.